# ७९ . सौंदर्य ( Beauty )

‘ सौंदर्य ’ हा शब्द आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे . हा शब्द समोर आला कि प्रथम आठवते ती जाहीरात / किंवा स्त्री . सौंदर्य वाढविण्या–या जाहीरातींचा रतीब टिव्ही वर चालू असतो . केसांचे सौंदर्य , त्वचेचे सौंदर्य , चेह–याचे सौंदर्य , डोळयांचे सौंदर्य ,दातांचे सौंदर्य असे बरेच प्रकार ह्या जाहीरातीत असतात . प्रत्येकवेळी एखादी सुंदर स्त्री ती जाहीरात करत असते .

सौंदर्य निरखायचे असेल तर आरसा हवाच . मित्रांनो तुमच्या चेह–यावरील आश्र्चर्याची मी कल्पना करू शकतो कि मी या विषयावर कसा काय लिहतोय ? बरोबर आहे . मला ह्या विषयावर वेगळया संदर्भात काही सांगायचे आहे . परंतु सौंदर्य हा शब्द ऐकल्यावर जे प्रथम डोळयांसमोर येते त्याबद्यल लिहणे क्रमप्राप्तच आहे .

**Beauty is not what your see in the mirror** . सौंदर्य म्हणजे नितांत गोरी त्वचा नव्हे . मला अपेक्षित आहे ते मनाचे सौंदर्य , निसर्गाचे सौंदर्य , वर्तणुकीचे सौंदर्य , विचारांचे सौंदर्य , श्रमांचे सौंदर्य वगैरे . ही वेगवेगळी सौंदर्यस्थळे शोधण्यासाठी आपली जडणघडण तशी असणे आवश्यक आहे . आपल्यावर कसे संस्कार केले जातील हे आपल्या हातात नसेल कदाचित . पण शिक्षणाने , अनुभवाने चुकीचे संस्कार आपण नक्कीच पुसू शकतो . ही दृष्टी आपल्याला मिळवावी लागेल .

काय पटतोय का विचार ? मला कोणाला दोष देयचा नाहीये . आपण जेव्हा कोणाला प्रथम भेटतो तेव्हा आपण खरेतर त्या माणसाच्या शरीराला भेटत असतो . आपल्या मनात दिसण्यावरून ‘ ग्रह ’ तयार झालेले असतात व आपणही सहजपणे त्या माणसाची वर्गवारी करून मोकळे होतो . खरेतर समोरचा माणूसही आपल्याला भेटल्यावर हेच करत असतो . परंतु जेव्हा आपण त्या माणसाला वारंवार भेटतो तेव्हा आपले लक्ष शारीरीक बाबींवरून वैचारीक बैठकीकडे वळते .

लग्न जमविताना शारीरीक अटीच जास्त असतात . उदा . उंची , रंग , बांधा , केस , डोळे वगैरे . पण लग्न हे दोन मनांचे मिलन असते . शरीराच्या आकर्षणाला वागणुकीची जोड मिळाली नाही तर त्या सौंदर्याची झिंग उतरायला वेळ कितीसा लागणार ? निसर्गाचे सौंदर्य बघायलाही दृष्टी तयार करावी लागते . सूर्य रोजच मावळतो व उगवतो . पण आपल्या गावातून , शहरातून मावळतीचा सूर्य बघायला आपल्याला वेळ नसतो किंवा आपण तो वेळ काढत नाही . परंतु **sunset point** बघायला आपण कोणत्यातरी हील स्टेशनाला जातो . त्यावेळी हिलस्टेशनवरील सर्वच मंडळी त्या पॉईंटवर जमलेली असतात . सूर्य मावळायच्या आधी कशी रूपे चटकन् बदलत असतो हे बघायला वेळच नसतो . कारण गेल्या गेल्या आधी भेळपूरी , पाणीपुरीवर ताव मारायचा असतो . सूर्य एकदाचा डूबायला आला कि २ – ४ मिनीटे बघितला कि जीवनाची किंवा हिल स्टेशनला आल्याचे सार्थक होते . कित्येक लोकांची हॉटेलवर परतायची घाई सुरू होते कारण लगेच अंधार होतो . मावळतीचा सूर्य बघताना मन कसे भरून आले पाहिजे . दिवसभर उजेड देण्याचे कर्तव्य पार पाडून तुम्हाला विश्रांती मिळावी म्हणून तो भास्कर जगाच्या दुस–या बाजूला उगवत असतो . खरेतर तो कधीच मावळत नाही . आपल्यासाठी मात्र त्याचे उगवणे व मावळणे असते .

आपणही ह्या सूर्यासारखे कर्तव्य तत्पर असावे , तसा प्रयत्न करावा वगैरे विचार मनात आले तर मावळतीचा सूर्य बघितल्याचे सार्थक होईल असे मला वाटते . माझ्या **second home** मधून उगवता सूर्य बघूनच मी दिवसाची सुरवात करतो . उगवता सूर्य बघून मन भरून येते . जगायला अजून एक दिवस देवाने बहाल केलेला व त्याचे सार्थक , चीज झाले पाहिजे असे मला वाटते . माझ्या गावातील सुमुद्रकिना–यावरून मावळतीचा सूर्य बघणे माझ्यासाठी नेहमीचाच क्रम आहे . मंद प्रकाशात , मोकळया आकाशात चमकणा–या चांदण्या , काळी दिसणारी झाडे , शांत समुद्र व रंगाची उधळण करून अस्ताला जाणारा सूर्य माझ्या मनाला मोहवून जातो . मी त्याला कॅमेरात बंदिस्त करायच्या निष्फळ प्रयत्न करतो .

तीच गोष्ट फुले , वाढणारी झाडे बघण्याचे. आपण पैसा खर्च करून , त्रास सहन करीत **valley of flowers** ला फुले बघायला जातो. बरे फुले बघायला मिळतिलच याची खात्री नाही. आपण कधी सोसायटीच्या बागेतील उगवणारी फुले बघायचे कष्ट घेतले आहेत का ? देवासाठी चार फुले गोळा करणा–यातच आपल्याला जास्त स्वारस्य. बदलत्या निसर्गाची रूपे कधी न्याहळली आहेत का ? श्रमाचे सौंदर्य कधी ओळखण्याचा प्रयत्न केला आहात का ? एखादा मजूर , माळी , सुतार कसा एकाग्रपणे , यांत्रिकपणे काम करताना बघणे खरेच आनंददायी असते. तुम्ही कधी आपली बायको स्वयंपाकघरात कशी लगबगीने कामे उरकीत असते , प्रत्येकाच्या वेळा व आवडी कशा सांभाळत असते ( व तेही हसतमुखाने ) निरखले आहे का ? माझा **PERT – CPM** लेख वाचल्यावर आपली खात्री पटेल की ह्या संज्ञेचा जन्म आपल्या किचनमध्येच झाला आहे.

वर्तणुकीतील सौंदर्य आपल्याला सुखावते. माणसाने माणसाला माणसासारखे वागवणे कधी ओळखले आहे ? खरे तर हे खूप अपवादात्मकच घडत असते. मी शहाणा व तू मुर्ख अशीच वर्गवारी करून वागणारी माणसेच जास्त असतात. पण दुस–याला दोष न देता आपणच तो वसा का सुरू करू नये ? निस्वार्थी मनाने दुस–याला संकटात मदत करून त्याच्या तणावरहित चेह– यावरील हसू कधी मनात कोरले आहे का ? आपण सर्वजण समाजाच्या चाली रितींचे जोखड होऊन आयुष्य जगत असतो. वेगळा विचार मनाला पटला तरी चांगला आहे ऐवढे म्हणण्याचे सुद्धा धारिष्ट्य करत नाही. तो विचार स्वतः प्रत्यक्षात आणण्याची बातच दूर. असे कितीतरी विचार नुसते प्रकट न करता त्याप्रमाणे वागण्याचा मी धडा घालून दिला आहे. लोकांचे विस्फारलेले डोळे , कपाळावरील आठया , उभ्या राहीलेल्या भुव्या बघून माझे मनोरंजनच होते. शिवाजी दुस–याच्या घरात जन्मलेला प्रत्येकालाच आवडतो. कोरडे कौतुक केले कि पुरते , त्यासाठी खस्ता काढायची गरज नसते.

मित्रांनो किती लिहू सौंदर्य ह्या विषयाबद्दल. विशिष्ट परिस्थितीत व कर्तव्यतप्तर दादांच्या सहवासात मी लहानाचा मोठा झालो. प्रत्येक गोष्टीच्या दिसणा–या बाजूच्या मागील बाजू उलगडण्यातच मला स्वारस्य. हा वसा मी दादांकडून घेतला आहे. आज माझे दादा स्वर्गातून माझ्याकडे बघत असतील व मला खात्री आहे कि माझे वागणे त्यांना नक्कीच सुखावत असेल.

लेखाच्या सुरवातीला मी म्हटले कि **Beauty is not what your see in the mirror.** खरेतर ‘ खरे ’ सौंदर्य बघण्यासाठी तुम्हाला मनाच्याच आरश्यात डोकवावे लागेल. पारा लावलेल्या काचेच्या आरशात तुम्हाला फक्त तुमचा चेहराच नजरेत पडेल. वाढणा–या वयाबरोबर त्वचेवरील सुरकुत्या , निस्तेज होणारे डोळे , पडणारे दात , गळणारे डोक्यावरील केसच दिसतील. हे दर्शन फारसे लोभनीय नसेल. पण ज्या कोणी त्वचेच्या पलिकडील सौंदर्य बघण्याचा प्रयत्न केला असेल त्याला आरशात बघावेसेच वाटणार नाही.

मला खात्री आहे कि हा लेख वाचल्यानंतर तुम्ही आरशात डोकावाल तेव्हा तुमच्या चेह–याबरोबरच , सौंदर्याची खरी ओळख शोधण्याचा प्रयत्न करून बघा .